# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08 / 11 / 2023 (बुधवार) सकाळ

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. खापा :– दिनांक २०/११/२०१९ चे ००/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे अप क्र. ३३८/२०१९ कलम ३७६, ३७६ (अ.ब) भादवि सहकलम ३(अ), ४(२), ५(ड), ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १२/११/२०१९ ते दि. १३/११/२०१९ चे १५/३० वा. ते १७/३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी पिडीता ही आपल्या घरी एकटी हजर असतांना यातील **आरोपी नामे– रवि उर्फ रविंद्र काशीनाथ नंदनवार, वय ३२ वर्ष, रा. हनुमान घाट शहापुरा खापा** याने पिडीता ही घरी एकटी असल्याचा फायदा घेवुन पिडीतेच्या घराच्या आत प्रवेश केला व फिर्यादीच्या मुलीशी जबरी संभोग केला.

सदर प्रकरणाचे तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती सोनाली रासकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. श्री. डी. जे. जयस्वाल सा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयात सादर केले. आज दिनांक ०८/११/२०२३ रोजी मा. श्री. डी. जे. जयस्वाल सा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश यांनी वरील नमुद आरोपीस सदर गुन्हयात कलम ४ पोक्सो मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व १०००/–रु. दंड दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास तसेच कलम ६ पोक्सो मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व २०००/–रु. दंड दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी शहाजहा शेख मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन महिला पोलीस नायक वर्षा धर्मुळ पो.स्टे खापा यांनी मदत केली आहे.

### बॅटरी चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील फूड बॅन हॉटेल दहेगाव रंगारी येथे फिर्यादी नामे– अंगत तुळशीराम कोवे, वय ५० वर्ष, रा. दहेगाव रंगारी वार्ड क्र. २ हा फूड बॅन हॉटेल दहेगाव रंगारी येथे हॉटेलचे सामान ने –आण करण्याचे काम करतो हॉटेलचे सामान ने आण करणे करीता हॉटेल मालकाच्या मालकीचा अल्फा ऑटो क्र. एम एच –४९/जी– १०८८ हा आहे. तो बंद स्थितीत हॉटेलच्या आवारात उभा होता. दिनांक ०६/११/२०२३ चे १२/०० वा. ते दिनांक ७/११/२०२३ चे सकाळी ०८/०० वा. दरम्यान ऑटो मध्ये लागलेली हिरव्या रंगाची अँमरॉन कंपनीची बॅटरी किंमती ६०००/–रुपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव पोस्टे खापरखेडा मो. नं. ९९२३१०४३१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर